# विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/६६/२०२५ दि. ०९/०४/२०२५

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** उल्हासनगर शहर, वाहतुक उपविभाग विठ्ठलवाडी अंर्तगत दि. १४/०४/२०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त लहान मोठया मिरवणुका व ०२ मुख्य मिरवणुक काढण्यात येणार आहे. सदर मुख्य मिरवणुक ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुभाष टेकडी, उल्हासनगर ४ येथे समाप्त होणार असून मिरवणुकी दरम्यान मिरवणुक मार्गावर वाहतुक कोंडी न होता मिरवणुक सुरळीत पार पाडता यावी व परिसरातील वाहतुक सुरळित व सुनिश्चत व्हावी नागरीकाची गैरसोय होवू नये. याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए ११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद – व No Parking-** | १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुभाष टेकडी येथुन मिरवणुक सुरू – नागसेन नगर – कुर्ला कॅम्प – समता नगर १– काली माता मंदिर चौक – भाटीया चौक – नेताजी चौक – व्हिनस चौक – लाल चक्की चौक – सार्वजनिक मित्र मंडळ – परत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुभाष टेकडी येथे समाप्ती होईपर्यंत **No Parking** व **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | अ) उल्हासनगर स्टेशन कडुन आंबेडकर चौकाकडे येणारी वाहतुक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातुन तक्षशिला विदयालय मार्गे गुरूनानक शाळेकडुन इच्छीत स्थळी जातील.<br>ब) अंबरनाथ व कैलाश कॉलनी कडुन येणारी वाहतुक कुर्ला कॅम्प समतानगर ओ. टी. सेक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>क) मठ मंदिर चौक व गांधी रोड तसेच हिललाईन पो. स्टे. कडुन येणारी वाहतुक ही नेताजी चौकातुन बंगलो ऐरीया मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>ड) व्हिनस चौकाकडुन उल्हासनगर स्टेशनकडे जाणारी वाहतुक २५ सेक्शन स्मशानभुमी मार्गे संभाजी चौक कडुन इच्छीत स्थळी जातील.<br>ई) उल्हास स्टेशन कडुन संभाजी चौकाकडे येणारी वाहतुक ही संभाजी चौकातुन भाटीया चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद – व No Parking-** | २) श्री राम चौक – ओ.टी सेक्शन चौक – मेनबाजार – व्हिनस चौक – नेताजी चौक – भाटीया चौक – ३९ सेक्शन – गाऊन बाजार – दुध नाका – मठ मंदिर चौक – या मिरवणुकीच्या **मार्गावरील वाहतुक तसेच रहदारी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक पुढील चौकात जाई पर्यत सदरची वाहतुक तातुरता स्वरूपात आवश्यक त्या पर्यायी मार्गाने वळविण्यात येईल. तसेच ( दि. १४/०४/२०२५ रोजी सकाळी ०९:०० वा ते रात्री २४:०० वा पवोतो ) सर्व वाहनांना पार्कींग करण्यास मनाई करण्यात येत आहे.** |
| **पर्यायी मार्ग –** | अ) श्री राम चौकाकडुन ओ.टी सेक्शन कडे जाणारी वाहतुक पेट्रोलपंपाचे बाजुने व्हि.टी.सी.रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>ब) ओ.टी.सेक्शन कडुन मेन मार्केट कडे जाणारी वाहतुक ही उल्हास स्टेशन कडे मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>क) नेताजी चौकाकडुन व्हिनस चौकाकडे जाणारी वाहतुक ही लालचक्की चौक व मानेरे गाव रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>ड) कैलास कॉलनी कडुन भाटीया चौक व नेताजी चौकाकडे येणारी वाहतुक ही संभाजी चौक व उल्हासनगर स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील.<br>ई) दुधनाका कडुन गाऊन मार्केटकडे येणारी वाहतुक ही ओ.टी.सेक्शन उल्हासनगर ५ मार्गे इच्छीत स्थळी जातील. |

CamScanner

सदरची अधिसुचना ही दि. १४/०४/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा. ते २४:०० वा पावेतो अंमलात राहील. सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर बिग्रेड, रूग्णवाहिका इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक, विभाग कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, महानगरपालिका, उल्हासनगर
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४, उल्हासनगर/विशेष शाखा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग कल्याण
प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर
प्रत :–
मा.पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकाच्या माहितीसाठी ठाणे पोलीस वेबसाईडवर प्रसिद्ध करण्यास विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए.एस.कक्ष ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सहा. पोलीस आयुक्त, उल्हासनगर वाहतूक विभाग, ठाणे शहर.
पोलीस निरीक्षक, उल्हासनगर/विठ्ठलवाडी, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner